# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.
## मा.स्थायी समिती

## कार्यपत्रिका क्रमांक - १९
## सभावृत्तांत

दिनांक - १४.८.२०१२ वेळ - दुपारी ३:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार दिनांक १४.८.२०१२ रोजी दुपारी ३.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.जगदीश शेट्टी - सभापती
२) मा.अविनाश (दादा) टेकावडे
३) मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
४) मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
५) मा.छाया जगन्नाथ साबळे
६) मा.जम सोनाली पोपट
७) मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
८) मा.पाडाळे निता विलास
९) मा.जगताप नवनाथ दत्तु
१०) मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
११) मा.भोसले राहुल हनुमंतराव
१२) मा.चोंधे आरती सुरेश
१३) मा.भालेकर अरुणा दिलीप
१४) मा.अश्विनी गजानन चिंचवडे - पाटील

याशिवाय मा. कदम - अति.आयुक्त, मा.सावंत-सहआयुक्त, मा. मुंढे, मा. कारचे, मा. ढेरे, मा.गावडे, मा.टेकाळे, मा.झुरे, मा.कुलकर्णी, मा.दुरगुडे, मा.बंब - सहा. आयुक्त, मा.घाडगे-मुख्यलेखापरिक्षक , मा.चाकणकर - प्र.नगरसचिव, मा.कांबळे - प्र.शहर अभियंता, मा.सुरगुडे - विकास अभियंता, मा.भोसले - मुख्यलेखापाल, मा.साळवी-वैदयकीय अधिकारी, , मा.भदाणे- उपसंचालक (नगररचना), मा.दुधेकर, मा.निकम, मा.चव्हाण, मा.जाधव, मा.कुदळे, मा.जाधव, मा.चिंचवडे, मा.कपिले, मा.साळवी, मा.पठाण, मा.लडकत, मा.कुलकर्णी, मा.दांगट- कार्य.अभियंता, मा.जाधव-शिक्षणाधिकारी, मा.चव्हाण - आरोग्य कार्यकारी अधिकारी, मा.डॉ.गोरे-पशुवैद्यकीय अधिकारी,मा.देशमुख-कायदा सल्लागार हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा. सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले :-**

विषय क्रमांक ३३:- अहमदाबाद अभ्यास दौ-याबाबत-मा.नवनाथ जगताप,मा.राहुल भोसले याचा प्रस्ताव.

विषय क्रमांक ३४:- स्थायी समिती सभा ठ.क्र.८६४ दि.३१/७/१२ मधे दुरुस्ती बाबत - मा.आरती चोंधे ,मा.अश्विनी चिंचवडे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक ३५:- स्थायी समिती सभा ठ.क्र. १७४ दि.१७/४/१२ मधे दुरुस्ती बाबत - मा.आरती चोंधे ,मा.अश्विनी चिंचवडे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक ३६:- स्थायी समिती सभा ठ.क्र. १६२३० दि.९/१२/११ मधे दुरुस्ती बाबत - मा.आरती चोंधे ,मा.अश्विनी चिंचवडे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक ३७:- जेएनएमयुआरएम सेव्हरेज फेज -२ या लेखाशिर्षावरिल कामांच्या तदतूदी मध्ये फेरबदल करणे- मा.आरती चोंधे, मा.सुषमा तनपूरे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक ३८:- भारतीय क्रिकेटयर्स सचिन तेंडूलकर व अजय शिर्के यांना मानपत्र देणेबाबत-मा.अश्विनी चिंचवडे , मा.सुषमा तनपूरे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक ३९:- वाहनतळासाठी जागा देणेबाबत- मा.सुषमा तनपूरे, मा.निता पाडाळे यांचा प्रस्ताव

विषय क्रमांक ४०:- पेठ क्र.४ मधील विहीर देखभाल दुरुस्तीबाबत-मा.सुषमा तनपूरे, मा.निता पाडाळे यांचा प्रस्ताव

विषय क्रमांक ४१:- सेक्टर २६ मधील टेनिस कोर्ट भाडयाने देणेबाबत- मा.सुषमा तनपूरे, मा.निता पाडाळे यांचा प्रस्ताव

विषय क्रमांक ४२:- आरक्षण क्रमांक ११७(पार्कीग आरक्षण ) भाडयाने देणेबाबत- मा.सुषमा तनपूरे, मा.निता पाडाळे यांचा प्रस्ताव

विषय क्रमांक ४३:- स्थायी समिती सभा ठ.क्र. ८७२ दि. ३१/७/१२ मधे दुरुस्ती बाबत - मा.निता पाडाळे, मा.विनया तापकीर यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक ४४:- मानधन अदा करणेबाबत- मा.सुषमा तनपूरे, मा.निता पाडाळे यांचा प्रस्ताव

विषय क्रमांक ४५:- स्थायी समिती सभा ठ.क्र. ८७९ दि. ३१/७/१२ मधे दुरुस्ती बाबत - मा.सुषमा तनपूरे, मा.निता पाडाळे यांचा प्रस्ताव

विषय क्रमांक ४६:- स्थायी समिती सभा ठ.क्र. ८३२ दि. २४/७/१२ मधे दुरुस्ती बाबत - मा.सुषमा तनपूरे, मा.निता पाडाळे यांचा प्रस्ताव

विषय क्रमांक ४७:- पीएमपीएलचे पास मोफत देणेबाबत- मा.आरती चोंधे, मा. सुषमा तनपूरे, यांचा प्रस्ताव

विषय क्रमांक ४८:- श्री.राजेंद्र अशोक ठोसर ,वॉर्डबॉय यांचा अपिल अर्ज.

----------

ठराव क्रमांक - ८८६ विषय क्रमांक - १
दिनांक - १४/८/२०१२ विभाग - उदयान
सुचक :- मा.अविनाश टेकावडे अनुमोदक :- मा.चंद्रकांत वाळके
संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.उदयान/६/कावि/१४७/१२ दि. ०१/०८/२०१२
मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे.

मनपाचे काळेवाडी येथील ज्योतिबा उद्यान (भाग १) देखभालीचे काम निविदा न मागविता थेट पध्दतीने देखभाल विकास व संरक्षणाकामी श्री.एन.व्ही.पडवळ यांना प्रतिमहा र.रू.१९,४५५/- [र.रू.एकोणीस हजार चारशे पंचावन्न] या दराने १२ महिने कालावधीसाठी देखभालीस देणेस व त्यासाठी येणारे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८८७ विषय क्रमांक - २
दिनांक - १४/८/२०१२
सुचक :- मा.विनया तापकीर अनुमोदक :- मा.छाया साबळे
संदर्भः- १) मा.निलेश पांढरकर,मा.रामदास बोकड यांचा प्रस्ताव
२) मा.क्रिडा समिती सभा दिनांक १/८/२०१२ ठराव क्र.१८ नुसार,

प्रस्तावात नमुद प्रमाणे शासकीय जिल्हास्तर शालेय क्रिडा स्पर्धा २०११ - १२ अनुषंगाने ५१ खेंळांपैकी १८ खेळांच्या स्पर्धांचे आयोजन खाजगी शाळांकडे सोपविल्याने त्याकामी त्यांना द्याव्या लागणा-या र.रु. १,२१,८४७/- चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८८८ विषय क्रमांक - ३
दिनांक - १४/८/२०१२
सुचक :- मा.निता पाडाळे अनुमोदक :- मा.नवनाथ जगताप
संदर्भः- १) मा.रामदास बोकड , मा. संपत पवार यांचा प्रस्ताव
२) मा.क्रिडा समिती सभा दिनांक १/८/२०१२ ठराव क्र.१९ नुसार,

प्रस्तावात नमुद प्रमाणे जिल्हास्तर शालेय ५० खेंळ प्रकारांच्या क्रिडा स्पर्धा २०१२ - १३ आयोजित करणेस व स्पर्धेकामी पी.व्ही.सी.फ्लेक्स, बॅनर, पंच मानधन, पंच चहा - अल्पोपहार खर्च, नारळ, बुके, पुजा खर्च, स्टेशनरी खर्च, साहित्य भाडेपोटी खर्च, प्रेक्षागृह भाडे, इतर खर्च इ. सन २०१२-१३ मध्ये विभागीयस्तर स्पर्धेसाठी म.न.पा.शाळेतील अंदाजे ३०० विद्यार्थी खेळाडू व राज्य पातळीवर १५०, राष्ट्रीय पातळीवर ५० व संघटनेमार्फत आयोजित क्रिडा स्पर्धेसाठी ५० शालेय खेळाडू त्यांच्या समवेत जाणारे क्रिडा शिक्षक व व्यवस्थापक यांचे प्रवास खर्च दैनिक भत्ता, प्रवेश फी, औषध खर्च, इ. अदा करणेकामी अंदाजे र.रु.१,००,०००/- तसेच खाजगी शाळा १२ क्रिडा स्पर्धा आयोजित करणार असल्याने त्यांना स्पर्धेचा खर्च र.रु.८०,७७०/- अदा करणेस असे एकूण येणा-या संभाव्य खर्च र.रु.८,६७,७१०/- अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास तसेच जिल्हास्तर शालेय क्रिडा स्पर्धा अनुषंगाने मंडप, बैठक व्यवस्था, ध्वनी /

विद्युत व्यवस्था, मैदान तयार करणे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे, इ. स्वरुपाचा खर्च हा प्रभाग कार्यालयामार्फत होणार आहे. त्यासाठी प्रत्यक्ष येणारा खर्च प्रभागाचे अंदाजपत्रकातून खर्ची टाकणेस, जिल्हास्तर शालेय क्रिडा स्पर्धा अनुषंगाने येणारा खर्च क्रिडा निधी-वार्षिक क्रिडा स्पर्धा, क्रिडा कला साहित्य या लेखाशिर्षावर केलेल्या एकूण तरतूद र.रु.४०,००,०००/- मधून खर्ची टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८८९ विषय क्रमांक - ४
दिनांक - १४/८/२०१२ विभाग - जनता संपर्क
सुचक :- मा.सोनाली जम अनुमोदक :- मा.सुषमा तनपुरे
संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.जसं/१/कावि/२५१/१२ दि.३०/७/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे.

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे जयंती महोत्सव थेट पध्दतीने करारनामा न करता दि.१/८/२०१२ व ५/८/२०१२ या कालावधीत आयोजित करणेकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

(अपेक्षित खर्च र.रू.५,५०,०००/- )

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८९० विषय क्रमांक -५
दिनांक - १४/८/२०१२ विभाग - स्थापत्य
सुचक :- मा.सुभद्रा ठोंबरे अनुमोदक :- मा.राहुल भोसले
संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. स्था/नि/१अ/कावि/२६०/१२ दि.३/८/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे.

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.अ मुख्यालय/ HO/१/२०१२-१३ मधील अ.क्र.३ अन्वये, आकुर्डी वॉर्ड क्र.१५ मध्ये संत तुकाराम महाराज व्यापार संकुल जवळ नाल्यावर पुल बांधणेकामी मे.युनिक ट्रेडर्स (नि.र.रू. ४६,६८,५३४/- [र.रू.शेहचाळीस लाख अडुसष्ट हजार पाचशे चौतीस] पेक्षा ७.९६ % कमी) या ठेकेदाराकडुन निविदा दर मंजुर दराने र.रू.४५,११,७६५/- पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा अटीप्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तीनही मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचे बरोबर करारनामा करून घेणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे .

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८९१ विषय क्रमांक - ६
दिनांक - १४/८/२०१२ विभाग - नगररचना व विकास
सुचक :- मा.आरती चोंधे अनुमोदक :- मा.अरुणा भालेकर
संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नरवि/कावि/आ-२/६३६/१२ दि.३ /८/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे.

श्री.शरद विनायक नाईक यांना दरमहा र.रू.२५,०००/- [र.रू.पंचवीस हजार] एकत्रीत मानधनावर समन्वयक भुसंपादन या पदावर ६ महिने कालावधीसाठी नियुक्ती करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८९२ विषय क्रमांक - ७
दिनांक - १४/८/२०१२ विभाग - पर्यावरण अभियांत्रिकी
सुचक :- मा.अश्विनी चिंचवडे अनुमोदक :- मा.अविनाश टेकावडे
संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. पअक/कावि/३५४/१२ दि.३/८/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे.

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी Arbitration Application No.२४१ of २०११ बाबत अर्बिट्रेटर म्हणून मा.जस्टीस पी.बी.सावंत यांची नेमणूक केलेली असल्याने व मा.अर्बिट्रेटर यांचेकडे दि.२७/४/२०१२ रोजी झालेल्या मिटींगमध्ये ठरलेनुसार व त्यांनी मागणी केलेनुसार त्यांना आगाऊ फी र.रू.८५,०००/- अदा करणे आवश्यक असून सद्यपरिस्थितीमध्ये सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने यापुढेही याप्रकरणाचा निकाल लागेपर्यंत असा खर्च येणार असल्याने र.रू. ८५,०००/- व यापुढेही येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८९३ विषय क्रमांक - ८
दिनांक - १४/८/२०१२ विभाग - आरोग्य मुख्यालय
सुचक :- मा.चंद्रकांत वाळके अनुमोदक :- मा.विनया तापकीर
संदर्भः- मा.आरोग्य कार्यकारी अधिकारी यांचे जा.क्र.आमु/२/कावि/६५७/१२ दि.४/८/२०१२

मा.आरोग्य कार्यकारी अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे.

शाहीरी कला मंदिर यांनी संत गाडगेबाबा स्वच्छता अभियानांतर्गत रणगाथा शौर्याची ह्या पथनाट्याव्दारे स्वच्छतेबाबत तसेच पर्यावरण मलेरिया, स्वाईनफ्यू, भृण हत्या याबाबत महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक इ.ठिकाणी पथनाट्याचे प्रयोग करून समाज प्रबोधनकार्य केले असल्याने त्यांचा पुर्वानुभव विचारात घेता शाहीरी कला मंदिर प्रस्तुत रणगाथा शौर्याची यांना संत गाडगेबाबा स्वच्छता अभियानांतर्गत पथनाट्याचे अ, ब, क, ड प्रभागात एकूण २० प्रयोग सादर करण्यास व त्यासाठी प्रति प्रयोग र.रू.७,०००/- प्रमाणे एकूण र.रू. १,४०,०००/- चे येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८९४ | विषय क्रमांक - ९
दिनांक - १४/८/२०१२ | विभाग - स्थापत्य
सुचक :- मा.छाया साबळे | अनुमोदक :- मा.सोनाली जम
संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/३क/कावि/२४/१२ दि.६/८/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे.

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.३/२०१२-१३ मधील अ.क्र.५९ अन्वये, वॉर्ड क्र.१२ चऱ्होली गावठाणा तील रस्त्यावर स्ट्रॉम वॉटर लाईन टाकणेकामी मे.कृष्णरत्न कन्स्ट्रक्शन (नि.र.रू.३७,३३,८७५/- [र.रू. सदोतीस लाख तेहतीस हजार आठशे पंच्याहत्तर] पेक्षा १६.१८ % कमी) या ठेकेदाराकडुन निविदा दर मंजुर दराने र.रू.३२,८६,२२१/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तीनही मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचे बरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८९५ | विषय क्रमांक - १०
दिनांक - १४/८/२०१२ | विभाग - स्थापत्य
सुचक :- मा.सुषमा तनपुरे | अनुमोदक :- मा.निता पाडाळे
संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/३क/कावि/२३/१२ दि.६/८/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे.

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.३/२०१२-१३ मधील अ.क्र.७६ अन्वये, वॉर्ड क्र.१३ दिघी येथील रस्त्याचे खडीकरण करणेकामी मे.कृष्णरत्न कन्स्ट्रक्शन (नि.र.रू.३७,३४,६६३/- [र.रू.सदोतीस लाख चौतीस हजार सहाशे त्रेसष्ट] पेक्षा २३.१८ % कमी) या ठेकेदाराकडुन निविदा दर मंजुर दराने र.रू. ३०,१२,४१७/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तीनही मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचे बरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८९६ | विषय क्रमांक - ११
दिनांक - १४/८/२०१२ | विभाग - स्थापत्य
सुचक :- मा.नवनाथ जगताप | अनुमोदक :- मा.सुभद्रा ठोंबरे
संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/३क/कावि/२२/१२ दि.६/८/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे.

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.३/२०१२-१३ मधील अ.क्र.१६ अन्वये, लांडेवाडी चौक ते नाशिक रस्ता सर्व्हिस रस्ते तयार करणेकामी मे.कृष्णरत्न कन्स्ट्रक्शन (नि.र.रू.३७,२०,९६१/- [र.रू. सदोतीस लाख वीस हजार नऊशे एकसष्ट] पेक्षा २०.१८ % कमी) या ठेकेदाराकडुन निविदा दर मंजुर दराने र.रू. ३१,१८,५७५/-

पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तीनही मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचे बरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८९७ विषय क्रमांक - १२
दिनांक - १४/८/२०१२ विभाग - वायसीएमएच
सुचक :- मा.राहुल भोसले अनुमोदक :- मा.चंद्रकांत वाळके
संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वी/मंपूर ,वायसीएमएच/११९/१२ दि.४/८/२०१२
मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे.

यशवंतराव चव्हाण रूग्णालयातील ३०० KVA क्षमतेच्या दोन जनरेटरचे वार्षिक देखभाल दुरुस्ती करणेचे कामकाज जनित्र उत्पादनाचे अधिकृत सेवा देणारी एजन्सी मे.ट्रायडेंट सर्व्हिसेस प्रा.लि., पुणे यांचेकडून दि.१/८/२०१२ ते ३१/७/२०१३ कालावधीकरिता करारनामा न करता करून घेणेस व त्याकामी येणाऱ्या एकूण र.रू.७४,७७५/- [र.रू.चौऱ्याहत्तर हजार सातशे पंच्याहत्तर] चे खर्चास व सदर खर्च आगावू अदा करणेस तसेच दुरुस्ती करीता लागणाऱ्या सुट्या भागांकरिता त्या त्या वेळी होणार खर्च त्या त्या वेळी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८९८ विषय क्रमांक - १३
दिनांक - १४/८/२०१२ विभाग - मध्यवर्ती भांडार
सुचक :- मा.आरती चोंधे अनुमोदक :- मा.अरुणा भालेकर
संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मभां/६/कावि/६२/१२ दि.६/८/२०१२
मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे.

मनपाचे यशवंतराव चव्हाण रूग्णालयाकरीता कट्टा कापड व डस्टर साहित्य खरेदी करणेकामी एकूण र.रू. ५६,०००/- [र.रू.छपन्न हजार] एवढा खर्च येणार असून सदरची खरेदी Handicap Centre Chinchwad यांचेकडून थेट पध्दतीने करारनामा न करता करणेकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८९९ विषय क्रमांक - १४
दिनांक - १४/८/२०१२ विभाग - पर्यावरण
सुचक :- मा.अश्विनी चिंचवडे अनुमोदक :- मा.विनया तापकीर
संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.पर्या/नि/कावि/३७७/१२ दि.७/८/२०१२
विषय- निविदा नोटीस क्रमांक ३/२/२०१२-१३ मधील कामाचे करारनामे करणेस मंजूरीबाबत.

विषय क्रमांक १४ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ९००　　　　　　　　　　　　विषय क्रमांक - १५
दिनांक - १४/८/२०१२　　　　　　　　　　　विभाग - वायसीएमएच
सुचक :- मा.अरुणा भालेकर　　　　　　　　　अनुमोदक :- मा.चंद्रकांत वाळके
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. वायसीएमएच/एमएस/कावि/३३६/१२
दि. ७/८/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे.

मनपाच्या यशवंतराव चव्हाण रूग्णालयाच्या वतीने Conference-vision-२०३० Health and Medical Services चे आयोजन करणेकामी येणारा र.रू. ९०,०००/- [र.रू.नव्वद हजार] खर्च हा निविदा कोटेशन न मागविता थेट पध्दतीने करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ९०१　　　　　　　　　　　　विषय क्रमांक - १६
दिनांक - १४/८/२०१२　　　　　　　　　　　विभाग - आरोग्य मुख्यालय
सुचक :- मा.सोनाली जम　　　　　　　　　　अनुमोदक :- मा.आरती चोंधे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.आमु/३/कावि/४५५/१२ दि.६/८/२०१२
विषय- निविदा नोटीस क्रमांक ८/२०११-१२ अ व ड प्रभाग कार्यक्षेत्रातील कचरा गोळा करणे व वाहतूक करणे या कामासाठीच्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.

विषय क्रमांक १६ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ९०२　　　　　　　　　　　　विषय क्रमांक - १७
दिनांक - १४/८/२०१२　　　　　　　　　　　विभाग - जलशुध्दीकरण केंद्र से.२३ विद्युत
सुचक :-मा.अविनाश टेकावडे　　　　　　　　अनुमोदक :- मा.राहुल भोसले
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.जशुकें/वि/२७०/१२ दि.७/८/२०१२
विषय- सन २०१२-१२ साठी अंदाजपत्रकात शुध्दअशुध्द जलउपासाकेंद्र से.२३ या लेखाशिर्षावर मागील वर्षा इतकी र.रु.३.२५ कोटी तरतूद मिळाल्यामूळे पाणीपुरवठा विभागाकडून होत असलेल्या कामास अनुसरुन विदयुत विभागाकडून कामे करणे विशेष योजना पाणीपुरवठा टप्पा-१ या लेखाशिर्षावरील र.रु.५ कोटी शुध्दअशुध्द जलउपसाकेंद्र से.२३ या लेखाशिर्षावर प्रस्तावा सोबतचे प्रपत्र अ प्रमाणे वर्ग करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत.

विषय क्रमांक १७ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ९०३ विषय क्रमांक -१८
दिनांक - १४/८/२०१२ विभाग - स्थापत्य
सुचक :- मा.अरुणा भालेकर अनुमोदक :- मा.चंद्रकांत वाळके
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/३क/कावि/३२/१२ दि.७/८/२०१२
मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे.

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.३/२०१२-१३ मधील अ.क्र.७५ अन्वये, नेहरूनगर मनपा गोडाऊनसाठी आर.सी.सी. सिमाभिंत बांधणेकामी मे.बरखा एंटरप्रायजेस (नि.र.रू. ४२,९५,००७/- [र.रू.बेचाळीस लाख पंच्यान्नव हजार सात] पेक्षा ६.९९ % कमी) या ठेकेदाराकडुन निविदा दर मंजुर दराने र.रू.४१,९४,५२५/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तीनही मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचे बरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ९०४ विषय क्रमांक - १९
दिनांक - १४/८/२०१२ विभाग - स्थापत्य
सुचक :- मा.अश्विनी चिंचवडे अनुमोदक :- मा.विनया तापकीर
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/३क/कावि/३१/१२ दि.७/८/२०१२
मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे.

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.३/२०१२-१३ मधील अ.क्र.४३ अन्वये, प्रभाग क्र.१०१ फुगेवाडी मधील विकास आराखड्यानुसार रस्त्यामधील व्हीनस सोसायटी ते कुणाल पुरम पर्यंत बंद पाईप गटर व कॉन्क्रीट पेव्हींग करणेकामी मे.एन.सी.कन्स्ट्रक्शन (नि.र.रू.४६,६८,४१७/- [र.रू.शेहचाळीस लाख अडुसष्ट हजार चारशे सतरा] पेक्षा १७.९९ % कमी) या ठेकेदाराकडुन निविदा दर मंजुर दराने र.रू.४०,१९,९९७/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तीनही मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचे बरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ९०५ विषय क्रमांक - २०
दिनांक - १४/८/२०१२ विभाग - मुलेप
सुचक :- मा.आरती चोंधे अनुमोदक :- मा.अरुणा भालेकर
संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जा.क्र. मुलेप/१/कावि/५५/१२ दि.७/८/२०१२

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागाकडील माहे जुलै २०१२ मधिल अद्ययावत एकूण कामकाज विषयक गोषवारा अहवाल अवलोकन करणेत येत आहे .

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ९०६ विषय क्रमांक - २१
दिनांक - १४/८/२०१२ विभाग - वैदयकीय मुख्य.कार्या.
सुचक :- मा.राहुल भोसले अनुमोदक :- मा.चंद्रकांत वाळके
संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. वैद्य/७/कावि/२१६५/१२ दि.७/८/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून-

मनपा कर्मचारी महासंघ, पिंपरी यांनी त्यांचेकडील दि.१२/४/२०१२ चे पत्रान्वये सद्यस्थितीत पेन्शन रकमेमध्ये वाढ झालेली असलेमुळे वैद्यकीय प्रतिपुर्ती व वैद्यकीय अग्रीम धोरणा मधील र.रू.३,०००/- ची अट शिथिल करणेस विनंती केलेली असून सहाव्या वेतन आयोगानुसार पेन्शनमध्ये तुलनात्मक दृष्ट्या जेवढी वाढ झाली आहे. तेवढी वाढ र.रू.३,०००/- च्या मर्यादेत (In proportion of ration) नुसार प्रस्तावित करणे आवश्यक असून प्रस्तुत प्रकरणी मुख्य लेखापाल यांचेकडील प्राप्त अभिप्रायानुसार वैद्यकीय प्रतिपुर्ती व वैद्यकीय अग्रीम धोरणामधील " निवृत्ती वेतन घेत असलेले मनपा कर्मचाऱ्याचे आई वडील हे त्याचे कमाल उत्पन्न दरमहा (मुळ वेतन) र.रू. ६,७८२/- असेल तर या अटीस अधीन राहून मनपा कर्मचाऱ्यांवर अवलंबुन नसल्याचे समजण्यात येईल" अशी मा.आयुक्त यांची शिफारस असली तरी सदरची अट वगळणेत येवून वैद्यकीय प्रतिपूर्ती व अग्रीम धोरण ठरविणेस मान्यता देणेत यावी अशी महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ९०७ विषय क्रमांक - २२
दिनांक - १४/८/२०१२ विभाग - माध्यमिक शिक्षण
सुचक :- मा.नवनाथ जगताप अनुमोदक :- मा.सुभद्रा ठोंबरे
संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.माध्य/शि/५/कावि/१८२/१२ दि.७/८/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे.

मनपाच्या १८ माध्यमिक विद्यालयातील विविध परीक्षांकामी प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका, भारत नकाशा, जगाचा नकाशा, आलेख पेपर, चित्रकला पेपर, सुतळी, दोरा इ. बाबींचा ई.नि.नो.क्र.२/१२-१३ नुसार पुरवठा करणेकामी मे.विशाल एंटरप्रायजेस रहाटणी पुणे-१७ एकूण र.रू.१७,३८,२००/- चे खर्चास संबधीतांबरोबर करारनामा करणेस, संबंधीतांस कामाचे आदेश देणेस, निविदा अटी शर्तीनुसार प्रस्तावित कामकाज सुरूवातीपासून ३ वर्षाकरीता देणेस तसेच प्रत्यक्ष येणाऱ्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ९०८ विषय क्रमांक - २३
दिनांक - १४/८/२०१२ विभाग - पाणीपुरवठा
सुचक :- मा.सुषमा तनपुरे अनुमोदक :- मा.निता पाडाळे
संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.पापु/नि/कावि/९५६/१२ दि.६/८/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे.

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.१/२०१२-१३ मधील अ.क्र.२ अन्वये, मनपाचे से.२३ निगडी येथील जलशुध्दीकरण केंद्रासाठी पावडर पॉलीॲल्युमिनिअम क्लोराईड पुरविणेकामी मे.एस.व्ही.एस.केमिकल कॉर्पोरेशन (नि.र.रू. ९०,३०,०००/- [र.रू.नव्वद लाख

तीस हजार] र.रू.३०,३००/- प्रति मे.टन) या ठेकेदाराकडून करारनामा करून घेणेस व याकामी येणाऱ्या र.रू.६३,६३,०००/- च्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ९०९ विषय क्रमांक - २४
दिनांक - १४/८/२०१२ विभाग - पाणीपुरवठा
सुचक :- मा.छाया साबळे अनुमोदक :- मा.सोनाली जम
संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.पापु/नि/कावि/९५५/१२ दि.६/८/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे.

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.१/२०१२-१३ मधील अ.क्र.१ अन्वये, मनपाचे से.२३ निगडी येथील जलशुध्दीकरण केंद्रासाठी द्रवरूप पॉलीॲल्युमिनिअम क्लोराईड पुरविणेकामी मे.एस.व्ही.एस.केमिकल कॉर्पोरेशन (नि.र.रू. १,२२,००,०००/- [र.रू.एक कोटी बावीस लाख] र.रू.१२,२००/- प्रति मे.टन) या ठेकेदाराकडून करारनामा करून घेणेस व याकामी येणाऱ्या र.रू.८५,४०,०००/- च्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ९१० विषय क्रमांक - २५
दिनांक - १४/८/२०१२ विभाग - पर्यावरण अभियांत्रिकी
सुचक :- मा.चंद्रकांत वाळके अनुमोदक :- मा.विनया तापकीर
संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.पअक/कावि/३८१/१२ दि.७/८/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे.

पिंपरी पुलाखालील कत्तलखान्याचे ETP ट्रीटमेंट प्लॅन्ट चालन देखभाल दुरुस्ती करणेकामी मे.लोटस एन्व्हायरमेंट टेक्नॉलॉजी प्रा.लि. यांचा विषयांकीत कामासाठी -१४.०० % कमी म्हणजेच र.रू.१९,३४,६९०/- (प्रति महिना र.रू.५३,७४१/-) हा दर स्विकृत केला असून वरील ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.१९,३४,६९०/- (प्रतिमहिना र.रू.५३,७४१/-) पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा अटीप्रमाणे करारनामा करून घेणेत आलेला असून संबंधीतास कामाचे आदेश देणेत आलेले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे .

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ९११ विषय क्रमांक - २६
दिनांक - १४/८/२०१२ विभाग - क्रिडा
सुचक :- मा.अश्विनी चिंचवडे अनुमोदक :- मा.अविनाश टेकावडे
संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. क्रीडा/३/कावि/१३२/१२ दि.८/७/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे.

ऑलिम्पिक स्पर्धेची जनजागृती पिंपरी-चिंचवड शहरातील विद्यार्थी व नागरीकांमध्ये होण्याच्या दृष्टीने मनपा परिसरातील सहभागी झालेल्या प्राथमिक व माध्यमिक १,२०० विद्यार्थ्यांना गुड डे बिस्किटे (खाऊ) देणेकामी ब्रिटानिया गुड डे रिच बटर-८१ ग्रॅम १ पॅकेटचे वितरक गायत्री एन्टरप्रायजेस, यशवंतनगर, पिंपरी-१८. यांचेकडून थेट पध्दतीने ब्रिटानिया गुड डे रिच बटर-(८१ ग्रॅम)-१२०० पॅकेट खरेदी करणेकामी प्रति पॅकेट दर र.रू.९=०९ प्रमाणे एकुण र.रू.१०,९०८/- इतका खर्च आला असल्याने सदरचे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक - ९१२ विषय क्रमांक - २७
दिनांक - १४/८/२०१२ विभाग - पशुवैद्यकीय
सुचक :- मा.आरती चोंधे अनुमोदक :- मा.अरुणा भालेकर
संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.पवै/१/कावि/५०७/१२ दि.७/८/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे.

मनपाच्या पशुवैद्यकीय विभागाकरीता आवश्यक लागणारे CNG Pet Incinator with installation and commissioning मशिन खरेदीकामी प्राप्त निविदा दरानुसार लघुत्तम निविदाधारक मे.ओम एन्टरप्रायजेस यांचेकडून खरेदीकामी येणाऱ्या र.रू.३८,००,०००/- [र.रू.अडोतीस लाख] चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ९१३ विषय क्रमांक - २८
दिनांक - १४/८/२०१२ विभाग - स्थापत्य
सुचक :- मा.सुभद्रा ठोंबरे अनुमोदक :- मा.राहुल भोसले
संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/४ड/कावि/२७७/११ दि.८/८/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे.

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.अ मुख्यालय/ HO/१/२०१२-१३ मधील अ.क्र.१०६ अन्वये, नवीन प्रभाग क्र.१ तळवडे-रूपीनगर भागातील नव्याने विकसीत होणारे रस्ते खडीमुरुम व बी.बी.एम.पध्दतीने करणेकामी मे.सुदाम बी.गुंड (नि.र.रू.२८,०१,१२०/- [र.रू.अठ्ठावीस लाख एक हजार एकशे वीस] पेक्षा ३२.३२ % कमी) या ठेकेदाराकडुन निविदा दर मंजुर दराने र.रू.१९,९०,५८८/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेमधील निविदा अटीप्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तीनही मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचे बरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ९१४ विषय क्रमांक - २९
दिनांक - १४/८/२०१२ विभाग - स्थापत्य
सुचक :- मा.निता पाडाळे अनुमोदक :- मा.नवनाथ जगताप
संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/१अ/कावि/२७६/११ दि.८/८/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे.

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.अ मुख्यालय/ HO/१/२०१२-१३ मधील अ.क्र.२५ अन्वये, अ प्रभागातील आवश्यक व तातडीची कामे करणेकामी मे.वेदार्थ असोसिएट्स (नि.र.रू.४६,६८,५३४/- [र.रू.शेहचाळीस लाख अडुसष्ट हजार पाचशे चौतीस] पेक्षा १३.२६ % कमी) या ठेकेदाराकडुन निविदा दर मंजुर दराने र.रू.४२,५१,९६१/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेमधील निविदा अटीप्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तीनही मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट

दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचे बरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ९१५ विषय क्रमांक - ३०
दिनांक - १४/८/२०१२ विभाग - झोनिपू
सुचक :- मा.सोनाली जम अनुमोदक :- मा.सुषमा तनपुरे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.झोनिपू/१५/कावि/१४७/१२ दि.७/८/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे.

बी.आर.टी.एस.प्रकल्पांतर्गत मायक्रोप्लॅन अहवालातील काळेवाडी ते देहूआळंदी व वाकड ते नाशिकफाटा मार्ग बी.आर.टी.एस.रस्ताबाधित प्रस्तावा सोबत जोडलेल्या परिशिष्ठ अ प्रमाणे अ.क्र.१ ते ३६७ प्रकल्पग्रस्तांना त्यांचे नावासमोर नमुद केल्याप्रमाणे नुकसान भरपाई व्यतिरिक्त इतर आर्थिक लाभ अदा करणेसाठी त्याचप्रमाणे दि.५/७/२०१२ रोजीच्या पत्रासोबत जोडलेल्या यादीतील अ.क्र.३१५, ३६३ व ३६५ बंद आहेत व अ.क्र.३४२ वर लाभार्थ्यांचे संपुर्ण नाव नमुद नसल्याने त्या समोर दर्शविलेल्या रक्कमेस मंजूरी मिळणे व भविष्यात सदर अनुक्रमांकावरील लाभार्थी उपलब्ध झाल्यास त्याची शहनिशा झालेनंतर त्यांना रक्कम अदा करण्यात येईल यास अधिन राहून सदर खर्च र.रू.२२,५५,६००/- [र.रू.बावीस लाख पंचावन्न हजार सहाशे] नगररचना विभागाकडील भूसंपादन निधी या लेखाशिर्षामधून खर्ची टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ९१६ विषय क्रमांक - ३१
दिनांक - १४/८/२०१२ विभाग - ब प्रभाग
सुचक :- मा.विनया तापकीर अनुमोदक :- मा.छाया साबळे
संदर्भ:- मा.प्रभाग अधिकारी यांचे जा.क्र.बप्र/७/कावि/५०८/१२ दि. ८/८/२०१२

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे.

मनपाच्या ब प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.१/२०१२-२०१३ अन्वये, ब प्रभाग परिसरात औष्णिक धुरिकरण करण्यासाठी झेन फॉग व वॅन फॉग मशिन ठेवून कामकाज करण्यासाठी आवश्यक पेट्रोल रिक्षा टेम्पो भाड्याने वाहनचालकासह घेणेकामी मे.प्रज्ञा ट्रान्सपोर्ट (नि.र.रू.२,३१,०००/- [र.रू.दोन लाख एकतीस हजार] सुधारित दर र.रू.६८५/- प्रति टेम्पो प्रतिदिन) या ठेकेदाराबरोबर करारनामा करून घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ९१७ विषय क्रमांक - ३२
दिनांक - १४/८/२०१२ विभाग - संगणक
सुचक :- मा.अविनाश टेकावडे अनुमोदक :- मा.चंद्रकांत वाळके
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.संगणक/५/कावि/२९९/१२ दि.७/८/२०१२
मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे.

Property Tax, Water Tax & Building Permission या तीन संगणक प्रणालींचे Third Party Testing करणे बाबतचे दरपत्रक र.रू.१,२०,०००/- [र.रू.एक लाख वीस हजार] M/s.Suma Soft Pvt Ltd, Pune या CERT Impaneled संस्थेने सादर केलेले असून त्यांचेकडून तातडीची बाब विचारात घेता निविदा न मागविता थेट पध्दतीने करारनामा न करता सदर तीन प्रणालींचे Third Party Testing करणेकामी व सदरचा खर्च संगणक विभागाकडील संगणक खरेदी व सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट या लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**<u>सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले</u>**

ठराव क्रमांक - ९१८ विषय क्रमांक - ३३
दिनांक - १४/८/२०१२
सुचक :- मा. नवनाथ जगताप अनुमोदक :- मा.राहूल भोसले
संदर्भ:- मा. नवनाथ जगताप, मा. राहूल भोसले यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महिला सदस्यांचा अहमदाबाद येथे अभ्यास दौ-यास विभागीय नागरी पर्यावरण अभ्यास केंद्र, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई यांनी आयोजित केला असून करारनाम्याप्रमाणे झोपडपट्टी पुनर्वसन ( मा.शहर सुधारणा समिती ) व समाज सुधार समिती ( मा.महिला बाल कल्याण समिती ) असे एकूण १८ सदस्य व अधिका-यांचा अभ्यास दौरा आयोजित केला आहे. यामध्ये दोन्ही समितीमधील एकूण ८ महिला व १० पुरुष सदस्यांचा समावेश आहे. मा. महापौर यांनी केलेल्या शिफारशीनुसार फक्त म.न.पा.च्या सर्व महिला सदस्यांचा सदर दौ-यास समावेश करणेकामी लेखी शिफारस केलेली आहे. सबब ८ महिला सदस्य ( मा. शहर सुधारणा समिती व महिला बाल कल्याण समिती ) व्यतिरिक्त अहमदाबाद दौ-यास येणेस तयार असलेल्या इतर २८ मनपा महिला नगरसदस्यांचा व कार्यालयाचा एक प्रतिनिधी यांना व मनपाचे १४ अधिका-यांना माहे सप्टेंबर २०१२ अखेर शासन नियमानुसार प्रवास व निवास खर्चापोटी आगाऊ रक्कम अदा करणेस व होणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ९१९ विषय क्रमांक - ३४

दिनांक - १४/८/२०१२

सुचक :- मा. आरती चौंधे अनुमोदक :- मा.अश्विनी चिंचवडे

संदर्भ:- मा. आरती चौंधे, मा.अश्विनी चिंचवडे यांचा प्रस्ताव -

मा.स्थायी समिती सभा ठराव क्रमांक ८६४, दिनांक ३१/०७/२०१२ मधील ८' X १०' ची हा मजकूर वगळण्यात येवून व त्या ऐवजी १५' X २०' ची हा मजकूर समाविष्ट करण्याची दुरुस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ९२० विषय क्रमांक - ३५

दिनांक - १४/८/२०१२

सुचक :- मा. आरती चौंधे अनुमोदक :- मा.अश्विनी चिंचवडे

संदर्भ:- मा. आरती चौंधे, मा.अश्विनी चिंचवडे यांचा प्रस्ताव -

मा.स्थायी समिती सभा ठराव क्रमांक १७४, दिनांक १७/०४/२०१२ चे ठरावामध्ये निविदा नोटीस क्र.९/१/२/२०११-१२ हा मजकूर वगळून त्या ऐवजी निविदा नोटीस क्रमांक १०/१/२/२०११-१२ असा मजकूर नमुद करण्याची दुरुस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ९२१ विषय क्रमांक - ३६

दिनांक - १४/८/२०१२

सुचक :- मा. आरती चौंधे अनुमोदक :- मा.अश्विनी चिंचचडे

संदर्भ:- मा. आरती चौंधे, मा.अश्विनी चिंचचडे यांचा प्रस्ताव -

मनपाच्या सिवर लाईन चोकपचे काम मे.बॅबोलाट असोसिएटस पुणे यांचे मार्फत करणेत येत आहे. निविदा क्र.३/२०११-११ दि. ३/८/२०१० कामाचा आदेश क्रमांक काशा /१/कावि/१३६६/२०११ दि.२३/१२/११ नुसार मे.बॅबोलाट असोसिएटस यांचे सदर काम एका शिफ्टमध्ये सुरु आहे . वाढत्या चोकपचे प्रमाण बघता व सायंकाळी येणा-या तक्रारींचे निवारण लवकरात लवकर होण्या करिता सदर चोकपचे काम इतर महापालिकेप्रमाणे दररोज किमान दोन शिफ्टमध्ये होणे गरजेचे आहे. तरी यापूर्वी मंजूर झालेला मा.स्थायी समिती सभा क्र.१६२३० दि.९/१२/२०११ या ठरावामध्ये दुरुस्ती करुन सदर काम दोन शिफ्टमध्ये करुन घेण्यास व त्याप्रमाणे सुधारित करारनामा वाढीव खर्चासह करण्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ९२२ विषय क्रमांक - ३७

दिनांक - १४/८/२०१२

सुचक :- मा. आरती चौंधे अनुमोदक :- मा. सुषमा तनपुरे

संदर्भ:- मा. आरती चौंधे , मा. सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव -

जेएनएनयुआरएम सेवरेज फेज-२ या लेखाशिर्षावरील कामांच्या तरतूदीमध्ये प्रस्तावात नमूद प्रमाणे वर्गीकरण ( वाढ/घट ) करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक - ९२३ विषय क्रमांक - ३८

दिनांक - १४/८/२०१२

सुचक :- मा.अश्विनी चिंचवडे अनुमोदक :- मा. सुषमा तनपुरे

संदर्भ:- मा.अश्विनी चिंचवडे , मा. सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव -

क्रिकेटमध्ये १०० शतके पुर्ण करण्याची ऐतिहासीक कामगिरी करणारा एकमेव जागतिक स्तरावरील भारतीय क्रिकेटीयर व भारताचा भूषण सचिन तेंडूलकर व क्रिकेट क्षेत्राचा विस्तार करण्यासाठी जागतिक स्तरावर क्रिकेट वाढविण्यासाठी अतुलनीय कामगिरी करणारे अजय शिर्के हे दोन महाराष्ट्र राज्याचे भूषण असल्याने त्यांना पिंपरी चिंचवड शहराच्यावतीने मानपत्र, स्मृतीचिन्ह, शाल इ. देणेस व त्यांचा यथोचित सन्मान करणेस तसेच त्यासाठी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ९२४ विषय क्रमांक - ३९

दिनांक - १४/८/२०१२

सुचक :- मा. सुषमा तनपुरे अनुमोदक :- मा.निता पाडाळे

संदर्भ:- मा. सुषमा तनपुरे , मा.निता पाडाळे यांचा प्रस्ताव -

श्री.केदारेश्वर समाज विकास मंडळ सेक्टर २४ निगडी-४४ यांस कै.माजी महापौर मधुकरराव पवळे उड्डाणपुला खालील मोकळी जागा द.म.र.रु.३५,०००/- ( मनपा व शासन करासह ) या दराने वाहनतळासाठी ३ वर्षे कालावधीसाठी देण्यास व त्याकामी करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ९२५ विषय क्रमांक - ४०

दिनांक - १४/८/२०१२

सुचक :- मा. सुषमा तनपुरे अनुमोदक :- मा.निता पाडाळे

संदर्भ:- मा. सुषमा तनपुरे , मा.निता पाडाळे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड नवनगरविकास प्राधिकरणाचे पेठ क्र.४ सुविधा भूखंड क्र.१ मधील विहीर देखभालीसाठी ( सुरक्षिततेच्या दृष्टीने जाळी बसवून ) श्री.बाबाजी आप्पा सस्ते यांस ४० वर्षाचे भाडेपट्टयाने दरमहा र.रु.१००/- नाममात्र भाडे दराने देणेस तसेच पाण्याचा वापर करण्यासाठी परवागनी देण्यास व करारनामा करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ९२६ विषय क्रमांक - ४१

दिनांक - १४/८/२०१२

सुचक :- मा. सुषमा तनपुरे अनुमोदक :- मा.निता पाडाळे

संदर्भ:- मा. सुषमा तनपुरे , मा.निता पाडाळे यांचा प्रस्ताव -

निगडी प्राधिकरण सेक्टर २६ मध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे लॉनटेनिस कोर्ट असून त्यातील लॉनटेनिस कोर्ट नं.३ व ४ पिंपरी चिंचवड सामाजिक विकास मंच यांना

(मा.स्थायी समिती ठराव क्र. ८२५९ दि. २८/१२/२००४ नुसार ज्या पध्दतीने श्री.रोकडे यांना प्राधिकरणातील सेक्टर २५ मधील लॉनटेनिस कोर्ट भाडेतत्वावर देणेत आलेले आहे त्याच पध्दतीने ) पाच वर्षासाठी भाडेतत्वावर चालविण्यास देण्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ९२७ विषय क्रमांक - ४२

दिनांक - १४/८/२०१२

सुचक :- मा. सुषमा तनपुरे अनुमोदक :- मा.निता पाडाळे

संदर्भः- मा. सुषमा तनपुरे , मा.निता पाडाळे यांचा प्रस्ताव -

पिंपरी गांधीनगर येथील आरक्षण क्र.११७ येथे पार्कींग आरक्षण असून ते मनपाच्या अटी शर्तीनुसार भाडेतत्वावर स्नेहल महिला विकास प्रतिष्ठान यांना पाच वर्षे कालावधीसाठी निविदा न मागविता थेट पध्दतीने देणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ९२८ विषय क्रमांक - ४३

दिनांक - १४/८/२०१२

सुचक :- मा. निता पाडाळे अनुमोदक :- मा.विनया तापकीर

संदर्भः- मा. निता पाडाळे , मा.विनया तापकीर यांचा प्रस्ताव -

मा.स्थायी समिती सभा ठराव क्रमांक ८७२ दिनांक ३१/०७/२०१२ मध्ये ४) सुपर कॉम्प्युटर इन्स्टीटयुट या मजकूरा नंतर ५) आस्की कॉम्प्युटर हा मजकूर नमद करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ९२९ विषय क्रमांक - ४४

दिनांक - १४/८/२०१२

सुचक :- मा. सुषमा तनपूरे अनुमोदक :- मा.निता पाडाळे

संदर्भः- मा. सुषमा तनपूरे , मा.निता पाडाळे यांचा प्रस्ताव -

डॉ.प्र.रा.अहिरराव ,का.स.भांडारकर प्रा.वि.संशोधन केंद्र यांनी संस्कृतीच्या पाऊलखुणाचे संपादन केले आहे व फोटोग्राफीचे काम केले असून त्याबाबत योग्य ते मानधन त्यांना अदा करणेस व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ९३० विषय क्रमांक - ४५
दिनांक - १४/८/२०१२
सुचक :- मा. सुषमा तनपूरे अनुमोदक :- मा.निता पाडाळे
संदर्भः- मा. सुषमा तनपूरे , मा.निता पाडाळे यांचा प्रस्ताव -

मा.स्थायी समिती सभा ठराव क्रमांक ८७९ दिनांक ३१/७/२०१२ मधील साऊंड ऑपरेटर हा मजकूर वगळून व त्याऐवजी रंगमंच कामगार हा मजकूर नमूद करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ९३१ विषय क्रमांक - ४६
दिनांक - १४/८/२०१२
सुचक :- मा. सुषमा तनपूरे अनुमोदक :- मा.निता पाडाळे
संदर्भः- मा. सुषमा तनपूरे , मा.निता पाडाळे यांचा प्रस्ताव -

मा.स्थायी समिती सभा ठराव क्रमांक ८३२ दिनांक २४/०७/२०१२ मधिल परेश दिगंबर भोसे हा मजकूर वगळून त्याऐवजी परेश दिगंबर लोके हा मजकूर नमूद करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ९३२ विषय क्रमांक - ४७
दिनांक - १४/८/२०१२
सुचक :- मा. आरती चौंधे अनुमोदक :- मा. सुषमा तनपूरे
संदर्भः- मा. आरती चौंधे, मा. सुषमा तनपूरे यांचा प्रस्ताव -

मनपा परिसरात राहणारे महाराष्ट्र शासनाकडून गुणवंत कामगार पुरस्कार प्राप्त झालेल्या कामगारांस व त्यांचे कुटुंवियांस पीएमपीएलची मोफत प्रवास पास सुविधा देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ९३३ विषय क्रमांक - ४८

दिनांक - १४/८/२०१२

सुचक :- मा. सुषमा तनपूरे अनुमोदक :- मा.छाया साबळे

संदर्भ:- श्री.राजेंद्र अशोक ठोसर , वॉर्डबॉय यांचा मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ च्या कलम ५६ (४) अन्वये दिनांक ८/८/२०१२ चा अपील अर्ज.

विषय क्रमांक ४८ कामी मा.आयुक्त यांचा अहवाल अपेक्षित असल्याने तो प्राप्त झाल्या नंतरचे सभेचे वेळी विषय क्रमांक ४८ चा विचार करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

**(जगदीश शेट्टी )**
सभापती
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/१०८७/२०१२
दिनांक - १४/८/२०१२ चे लगत

प्र. नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रत- सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.